नि.फौ.ख.क्र.६९९/२०२२
शासन–वि–शेख अफुज
नि.क्र.४

मी शपथेवर खरे सांगतो की,
माझे नांव – राहुल श्रावण नगराळे,
वय अंदाजे ५७ वर्ष, कामधंदा– मजुरी,
राहणार– आलोडी, ता.व जि.वर्धा

..........................................................................................................

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ ची सरतपासणी – सरकारी वकील श्रीमती डी.पी.गेडाम यांच्या मार्फत.**

१. दिनांक २१.०७.२०२२ रोजी पोलिसांनी मला पंच म्हणून तारफैल वर्धा येथे आम रस्त्यावर बोलाविले नव्हते. मला आता जप्ती पंचनामा जो मला दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहीत नाही. सहीस P1/PW1 देण्यात येते. पोलिसांनी माझे बयाण नोंदविले नव्हते.

साक्षीदार हा त्याच्या पहिल्या बयाणास मुकारला असता, सरकारी वकीलांनी उलट तपासणीच्या स्वरुपात उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.

२. हे म्हणणे खरे नाही की पोलिसांनी मला पंच म्हणून बोलाविले होते व माझे आरोपीकडून एक मूठ असलेला चाकू जप्त केला होता. हे म्हणणे खरे नाही की माझे समक्ष जप्ती पंचनामा तयार करण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की त्यातील मजकूर वाचून त्यावर मी स्वाक्षरी केली. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीस वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

आरोपीतर्फे वकील – श्री.पी.एस.मानसाता विधीज्ञ यांनी उलट तपास नाकारला.

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्वीकृती | माझे समक्ष |
| GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE — Digitally signed by GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE Date: 2026.04.28 17:42:59 +0530 | GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE — Digitally signed by GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE Date: 2026.04.28 17:43:03 +0530 |
| (जी.व्ही.जांगडे–देशपांडे) | (जी.व्ही.जांगडे–देशपांडे) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, | मुख्य न्यायदंडाधिकारी, |
| वर्धा, दिनांक २८–०४–२०२६ | वर्धा, दिनांक २८–०४–२०२६ |